ISSN: 2348-1390 ③ IMPACT FACTOR: 6.033(SIJIF)

# NEW MAN

## INTERNATIONAL JOURNAL OF MULTIDISCIPLINARY STUDIES

VOL. 12 ISSUE 5 MAY 2025

A PEER REVIEWED AND INDEXED MONTHLY E-JOURNAL

*Editor- in- Chief*

**Dr. Kalyan Gangarde**

*Director,*

*Centre for Humanities and Cultural Studies, Kalyan (W)*

*Issue Editors*

**Dr. Govind Bavaskar**

*Balbhim Mahavidyalaya Beed*

**&**

**Dr. Jagannath Tattapure**

*Balbhim Mahavidyalaya Beed*

NEW MAN PUBLICATION

www.newmanpublication.com

परभणी

# Contents

1. Domestic Violence against Women in Contemporary Society
**Prof. Dr. Acharya R.D.**

2. Science and Humanities in Today's AI World: A Sociological Perspective with Special Reference to Maharashtra
**Dr. Gulab Pathan**

3. Women Empowerment in 21st Century
**Lulle Shridevi Manchakrao**

4. New Education Policy 2020 and Challenges of Quality Education
**Surekha Rambhau Shinde, Dr. Y.R. Ghodke**

5. Effect of Weight Training Program on Collegiate Weightlifters Upper Extremity Strength
**Akahay Pandurang Ugale, Dr. Sunil Mahavir Pandhare**

6. Role of Diet on Sports Performance
**Dr. Ketan Kailas Gaikwad**

7. Sport Injuries and Preventions
**Dr. Pravin Murlidharrao Bhosle**

8. From Tradition to Triumph: The Evolution and Commercialization of Kabaddi in India
**Dr. Ravindra Madhukarrao Kharat**

9. Future Trends in Nutritious Eating Habits: A Review
**Dr. Santosh Shahurao Ghorpade**

10. The Need of Stress Management in Sport
**Dr. Ekambekar Sanjeev Keshavrao**

11. Effect of 12 Week Plyometric Training (Pyt) on Vertical Jump Height of Volleyball Players
**Mr. Narendra Ratanrao Mundhe, Dr. Sunil Mahavir Pandhare**

12. The Psychological Factors Influencing Sports Performance
**Prof. Hande Vijaykumar Digambarrao**

13. Language, Identity, and Resistance: Reclaiming Voices in Post-Colonial South Asia
**Dr. Rubina Tabassum**

14. पर्यावरणातील बदलाचे मानवी आरोग्यावर होणारे परिणाम
**प्रा. अशोक रामचंद्र गोरे**

15. समकालीन समाजातील वाढती बेरोजगारी आणि गरिबीची सद्यस्थिती
**अशोक भीमराव वाघमोडे, प्रा. डॉ. विलास भगवानराव भिल्लारे**

16. पर्यावरणीय बदलाचे मानवी जीवनावरील परिणाम- एक समाजशास्त्रीय अभ्यास
**प्रा. डॉ. तुकाराम फिसफिसे**

17. नवीन शिक्षण धोरण 2020 आणि दर्जेदार शिक्षणाची आव्हाने
**प्रा. डॉ. बाळासाहेब नामदेवराव भांडवलकर**

18. महिला सबलीकरण आणि सामाजिक कायदे: एक समाजशास्त्रीय अभ्यास
**डॉ. बावस्कर गोविंद**

14.

# पर्यावरणातील बदलाचे मानवी आरोग्यावर होणारे परिणाम

**प्रा.अशोक रामचंद्र गोरे**
समाजशास्त्र विभागप्रमुख
व्यंकटेश महाजन महाविद्यालय, धाराशिव

**प्रस्तावना :-**

समाजशास्त्र विषयात मानवी सामाजिक जीवनाचा अभ्यास केला जातो. मानवी सामाजिक जीवन अनेक घटकांनी प्रभावित झालेले असते. मानव आणि पर्यावरण यांच्यातील परस्पर संबंधांचा आणि परस्परांवरील प्रभावाचा अभ्यास वर्तमानकाळात मोठ्या प्रमाणात केला जात आहे. पर्यावरण ही संकल्पनाच मुळी मानवाच्या सभोवतालच्या सर्व प्रकारच्या परिस्थितीची गोळाबेरीज अशा स्वरुपाची आहे. मानवाला आपल्या विविध गरजा भागविण्यासाठी प्राप्त पर्यावरणावर अवलंबून रहावे लागते. त्यामुळे मानवाचे पर्यावरणाशी संबंध प्रस्थापित होतात. पृथ्वीवरील पर्यावरणाचा मानवी जीवनावर होणारा परिणाम, विविध परिसंस्था प्रणालींच्या मानवी जीवनाशी असणारा संबंध यांचा अभ्यास आज आवश्यक झाला आहे. औद्योगिक क्रांतीनंतर मानवी क्रियांचे स्वरुप अत्यंत गुंतागुंतीचे बनत गेले. खाण उद्योग, कारखाने, उद्योग धंदे, वाहतूक, सर्व प्रकारच्या सेवा यांचा विकास आणि विस्तार झाला. त्याबरोबर मानवाचे निसर्गावरील आक्रमण वाढत गेले. नैसर्गिक संसाधनाच्या अनिर्बंध वापरामुळे नव्या समस्या किंवा आपत्ती वाढत गेल्या. पर्यावरणीय बदलांचे वाईट परिणाम आता स्पष्टपणे दिसू लागले आहेत.

मानव आणि पर्यावरण यांच्या संबंधातील विविध दृष्टिकोन विकसित झाले आहेत. कार्लमार्क्स यांनी निसर्ग हे मानवाचे उगमस्थान आहे असे म्हटले आहे. म्हणजेच मानव हा निसर्गाचाच एक भाग आहे, असे म्हटले आहे. म्हण्जोच मानव हा निसर्गाचाच एक भाग आहे. भांडवलशाही व्यवस्था ही निसर्गाच्या ऱ्हासाला जबाबदार आहे. महात्मा गांधी यांनी पर्यावरणाची हानी टाळण्यासाठी 'खेड्याकडे चला' हा नारा दिला. याबरोबरच ॲरिस्टॉटल, कॅरल गोल्ड, हॉवर्ड पार्सन्स, चार्ल्स टॉलमन, म.फुले यांनी देखील पर्यावरण संदर्भात आपले विचार मांडले आहेत.

पर्यावरण अध्ययनात प्रामुख्याने पर्यावरणाचा अर्थ, पर्यावरणाचे स्वरुप, पर्यावरणाचे प्रकार, परिसंस्था, परिसंस्थेची रचना, ऊर्जास्रोत, अन्नजाळी, नैसर्गिक साधन संपदा, पर्यावरण प्रदूषण, पर्यावरणीय आपत्ती, संपदा-संवर्धन आणि नियोजन, पर्यावरणबदल आणि पर्यावरण बदलाच्या समस्या यांचा समावेश होतो.जागतिक तापमानवाढ आणि पर्यावरण असंतुलन हा केवळ मानवासाठीच नाही तर सजीवसृष्टीसाठी मोठा धोका असल्याचे दिसून येते. पर्यावरणीय बदलाचे मानवी आरोग्यावर होणारे दुष्परिणाम याबाबत आपण विचार करणार आहोत.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे :-**

१. पर्यावरणाचा अर्थ लक्षात घेणे.
२. पर्यावरणाचा अर्थ लक्षात घेणे.
३. पर्यावरण असंतुलनाचे परिणाम अभ्यासणे.
४. पर्यावरणातील बदलाचे मानवी आरोग्यावर होणारे परिणाम.
५. शोधनिबंधाची गृहितके :-
६. पर्यावरण असंतुलन ही जागतिक समस्या आहे.
७. पर्यावरणीय बदलाला मानवी हाव कारणीभूत आहे.
८. पर्यावरणीय बदलाचे मानवी आरोग्यावर अनिष्ठ परिणाम होत आहेत.

**संशोधन पध्दती :-**

प्रस्तुत शोधनिबंध तथ्यसंकलनाच्या द्वितियक साधन सामग्रीवर आधारीत आहे. त्यासाठी संदर्भ ग्रंथ, मासिके विकिपिडीया या साधनांचा आधार घेण्यात आला आहे.

**विषय विश्लेषण :-**

१. पर्यावरणातील बदलाचे आणि आरोग्यावर प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष स्वरुपाचे परिणाम होतात. हे परिणाम अत्यंत खोलवर आणि गंभीर स्वरुपाचे आहेत. जागतिक तापमानवाढीमुळे जगभरात उष्णतेशी संबंधित अनेक आजार उत्पन्न होत आहेत. विविध प्रकारचे श्वसन

रोग, त्वचारोग आणि संसर्गजन्य रोगांचा यामध्ये समावेश आहेत. जागतिक तापमानवाढ आणि हवामानबदल हा २१ व्या शतकातील मोठा जागतिक आरोग्य धोका आहे.

२. वाढते तापमान आणि हवामानातील बदलामुळे जगाच्या विविध भागात उष्णतेच्या लाटा आणि तीव्र हवामान घटनांचा आरोग्यार दुष्परिणाम होत आहे. परिणामी उष्णतेशी संबंधीत आजार आणि मृत्यूचे प्रमाण वाढताना दिसत आहे.

३. हवामान बदलामुळे संसर्गजन्य आजारांच्या प्रमाणात वाढ होते. अतिसार, मलेरिया, त्वचारोग, डोळ्यांचे संसर्गजन्य रोग यांचे प्रमाण जगाच्या विविध भागात वाढलेले दिसून येते.

४. हवामानातील बदलामुळे काही प्रदेशात काही पिकांचे उत्पादन कमी होऊ शकते ज्यामुळे कुपोषणाची समस्या निर्माण होण्याची शक्यता बळावते. परिणामी गरीबी, मानवी स्थलांतर, हिंसक संघर्ष आणि मानसिक आरोग्याच्या समस्या निर्माण होतात.

५. अतिउष्णतेमुळे वृध्द लोकांच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर विपरीत परिणाम होताना दिसून येतो. उष्माघात, अतिताप, मूत्रपिंडाचे आजार, गर्भधारणेतील गुंतागुंत यासारख्या समस्या निर्माण होतात. २०१९ मध्ये ६५ वर्षापेक्षा जास्त वयाच्या लोकांमध्ये उष्णतेमुळे होणाऱ्या मृत्यूची नोंद ३,४५,००० एवढी आहे.

६. हवामानबदलाच्या प्रभावामुळे अन्न आणि पाणी यांची सुरक्षितता देखील धोक्यात आली आहे. शिवाय दुषित पाण्यामुळे गंभीर स्वरुपाचे आजार आणि मृत्यूचे प्रमाण वाढत आहे.

७. हवामानबदलाचे मानवी मानसिक आरोग्यावर देखील अनिष्ठ परिणाम दिसून येतात. नैराश्य, विसराळूपणा, आर्थिक कारणातून होणारे मानसिक तणाव यासारख्या मानसिक समस्या निर्माण होतात.

८. हवामान बदलामुळे सृष्टीतील अनेक प्राण्यांना, पक्ष्यांना आजार होतात त्यांचा संसर्ग मानवाला होतो आणि मानवी आरोग्य धोक्यात येते.

९. हवामान बदलामुळे नैसर्गिक संसंसाधनावर मर्यादा येतात त्यामुळे मानवी संघर्ष, युध्द आणि मृत्यूचे प्रमाण वाढते.

**निष्कर्ष :-**

१. मानवी हव्यासामुळे पर्यावरण असंतुलनाची समस्या निर्माण झाली आहे.
२. पर्यावरणी बदलाला मानव जबाबदार आहे.
३. पर्यावरणीय बदलामुळे मानवी आरोग्यावर वाईट परिणाम होत आहेत.
४. पर्यावरण संरक्षणाचे मानवी प्रयत्न मर्यादित आहेत.
५. पर्यावरण बदलामुळे मानवी शारीरिक, मानसिक व सामाजिक समस्या वाढत आहेत.

संदर्भ :-

१. 'पर्यावरण आणि समाज' – प्रा.शिल्पा कुलकर्णी, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे
२. 'पर्यावरण भूगोल'- डॉ.सुभाषचंद्र सारंग, विद्याप्रकाशन, नागपूर
३. 'पर्यावरण भूगोल'- डॉ.वराह/प्रा.बोरूडे, विद्याबुक्स पब्लिशर्स, छत्रपती संभाजीनगर
४. 'सामाजिक चळवळीचे समाजशास्त्र'- प्रा अरविंद वझे
५. 'पर्यावरणशास्त्र'-डॉ.विठ्ठल घारपुरे

❑❑❑